N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
## (Under Section 154 Cr.P.C.)
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** उस्मानाबाद **P.S.(ठाणे):** आनंदनगर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0282 **Year (वर्ष):** 2023
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**18/07/2023 12:51

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** बुधवार
**Time Period (कालावधी):** पहर 5
**Date From (दिनांक पासून):** 21/06/2023
**Date To ( दिनांक पर्यंत):** 21/06/2023
**Time From (वेळेपासून):** 13:09 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 14:18 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 18/07/2023 **Time (वेळ):** 11:45 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 015
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 18/07/2023 12:24 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** तहसिल कार्यालय उस्मानाबाद

(c) **In case, outside the limit of this Police Station, then**
**(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

Scanned with CamScanner

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** मुकुंद नागनाथ लामकाने

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1968

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रा उपळा मा, ,ता जि उस्मानाबाद,आनंदनगर,उस्मानाबाद,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रा उपळा मा, ,ता जि उस्मानाबाद,आनंदनगर,उस्मानाबाद,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9075778847

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्रीमती स्वाती ज्योतीबा खताळ | | | 1. लिपिक, तहसिल कार्यालय ,, सध्या जिल्हाधिकारी कार्यालय, उ,आनंदनगर,उस्मानाबाद, महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with CamScanner

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक 18/07/2023 मी मुकुंद नागनाथ लामकाने, वय 55 वर्ष, व्यवसाय शेती, रा.उपळा (मा), ता. जि.उस्मानाबाद. मो.नंबर 9075778847

मी दिनांक 21.06.2023 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, उस्मानाबाद येथे पोलीस निरीक्षक, श्री राठोड, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद यांचे समक्ष हजर राहुन माझी तक्रार दिली होती. त्यातील थोडक्यात हकीकत अशी की, माझे मौजे उपळा (मा) हद्दीत शेत गट नंबर 292 मधील एकुण क्षेत्रापैकी 1 हेक्टर 24 आर क्षेत्र असुन गट नंबर 288 व 289 मधील शेतकऱ्यांनी बांधावर अतिक्रमण करुन सर्वे नंबरचा बांध नाहीसा केलेला आहे. त्यामुळे मी तहसिलदार, उस्मानाबाद यांचेकडे जानेवारी 2022 मध्ये अर्ज दाखल केला होता. सदर अर्जाचे अनुषंगाने तहसिलदार माळी साहेब यांनी माझे शेतात येवुन पंचनामा केलेला असुन सदरचे प्रकरण अंतीम निकालावर आहे.

सदरचे प्रकरण हे तहसिल कार्यालय, उस्मानाबाद येथील खताळ मॅडम यांचेकडे असुन सदर प्रकरणाची चौकशी करण्यासाठी मी दिनांक 20.06.2023 रोजी तहसिल कार्यालय, उस्मानाबाद येथे जावुन खताळ मॅडम यांची भेट घेतली. तेव्हा मी त्यांना माझे शेत रस्त्याचे प्रकरणाचे निकाला बाबत विचारपुस केली असता त्यांनी सदर प्रकरणावर तहसिलदार साहेब यांची सही घेवुन प्रकरणाचा निकाल देण्यासाठी माझेकडे 15,000/- रुपयाची मागणी केली. तेव्हा मी त्यांना 15000/- रुपये खुप जास्त होतेत, 5000/- रुपये घ्या असे म्हणालो. तेव्हा त्यांनी एवढयात नाही होणार, ü 10,000/- रुपये दया असे म्हणाल्या वगैरे सविस्तर तक्रार दिली होती.

वरील प्रमाणे तक्रार दिल्यानंतर पोलीस निरीक्षक श्री राठोड यांनी माझी व दोन शासकीय पंच श्रीमती रेश्मा वेदपाठक, प्रतिलिपिक व श्री कल्याण गुंड, शिपाई दोघे उपअधीक्षक भुमिअभिलेख, उस्मानाबाद यांची तसेच त्यांचे सोबत असलेले स्टाफमधील कर्मचारी पोहेकॉ/ जाधव, पोना/पाटील, पोशि/डोके यांचेशी आपसी परिचय करुन दिला. तसेच पोनि राठोड यांनी पंच क्रमांक 1 म्हणुन श्रीमती रेश्मा वेदपाठक व पंच क्रमांक 2 म्हणुन कल्याण गुंड यांची निवड केली. त्यानंतर राठोड साहेब यांनी मला माझी तोंडी तक्रार सांगण्यास सांगितली असता मी माझी तोंडी तक्रार दोन्ही पंचासमक्ष सांगितली व ती संगणकावर टंकलिखित केली. संगणकावर टंकलिखित केलेली माझी तक्रार मी पुन्हा वाचुन बरोबर असल्याची खात्री करुन त्यावर मी व राठोड साहेब यांनी स्वाक्षरी केली. त्यानंतर सदरची तक्रार दोन्ही पंचांना वाचण्यास दिली. सदरची तक्रार दोन्ही पंचांनी वाचुन पाहिली. मी सांगितलेली तोंडी व संगणकावर टंकलिखित केलेली तक्रार एकच असल्याची खात्री झाल्यानंतर दोन्ही पंचांनी त्यावर सहया केल्या. त्यानंतर मी दिलेली तक्रार पोनि राठोड साहेब यांनी स्वत:कडे ठेवुन घेतली.

सदर ठिकाणी पोनि राठोड साहेब यांनी मला दोन्ही पंचासमक्ष सांगितले की, माझ्याकडे माझे तक्रारीमधील नमुद कामासाठी श्रीमती खताळ मॅडम या लाचेची मागणी करतात किंवा कसे ? याबाबत आज दिनांक 21.06.2023 रोजी पंचासमक्ष लाचमागणी पडताळणी करण्यात येणार आहे.

त्यानंतर राठोड साहेब यांनी दिलेल्या सुचनेवरुन पोहेकॉ/जाधव यांनी त्यांचेकडील एका काळया रंगाच्या बॅग मधुन Sony कंपनीचे डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर बाहेर काढुन त्यामध्ये 32 GB चे नवीन SanDisk कंपनीचे Micro SD HC अशा वर्णनाचे ज्याचा सिरिअल क्रमांक 2445XV712154 असलेले मेमरी कार्ड टाकले व राठोड साहेब यांनी कळविले की, लाचमागणी पडताळणी दरम्यान तक्रारदार व श्रीमती खताळ मॅडम यांचेत होणारे मुळ संभाषण हे व्हॉईस रेकॉर्डरमधील मेमरीकार्डमध्ये रेकॉर्ड होणार आहे. पोहेकॉ/जाधव यांनी सदर व्हाईस रेकॉर्डर चालु करुन त्यामध्ये पुर्वीचे कोणतेही संभाषण ध्वनी मुद्रीत झाले नसले बाबत मला व दोन्ही पंचाना खात्री करून देण्यात आली. त्यानंतर मला श्रीमती खताळ मॅडम या कोठे भेटतील याबाबत विचारले असता मी त्यांना खताळ मॅडम या तहसिल कार्यालय, उस्मानाबाद येथे भेटतील असे सांगितले. त्यावरुन पोनि राठोड साहेब यांनी मला सुचना केली की, मी पंच क्रमांक 1 श्रीमती वेदपाठक यांना सोबत घेवुन तहसिल कार्यालय, उस्मानाबाद येथे जावुन त्यांची भेट घ्यावी. त्यांना स्वत:चे कामाबाबत बोलावे. दरम्यान त्यांनी लाचेची मागणी केल्यास त्यांचेकडुन वेळ मागुन घेवुन सापळा



Scanned with CamScanner

पथक थांबलेल्या ठिकाणी परत यावे असे सांगितले. तसेच दोन्ही पंचांना देखील सुचना दिल्या.

त्यानंतर राठोड साहेब यांचे सुचनेवरुन पोहेकॉ/जाधव यांनी व्हाईस रेकॉर्डर चालु करुन माझे शर्टचे छातीच्या डावे बाजुस आतमध्ये बनियनला पिनने लावुन ठेवुन दिले. त्यानंतर मला व पंच क्रमांक 1 यांना माझेकडील मोटार सायकल क्रमांक एम.एच.25 ए.सी.6628 ने रवाना केले. त्यानंतर मी व पंच क्रमांक 1 असे तहसिल कार्यालय, उस्मानाबाद येथे गेलो. तेव्हा श्रीमती खताळ मॅडम या तहसिल कार्यालय, उस्मानाबाद येथे हजर होत्या तेंव्हा मी खताळ मॅडम यांना झाल का आपल्या शेतरस्त्याच त्या फाईलचं .. असे विचारले असता त्यांनी करुन देते सोमवार पर्यंत.. सही झाली की देते की.. बसा ना.. असे म्हणुन आणलेत का? असे विचारले. तेव्हा मी त्यांना नाही..यायचं होत म्हणलं.. मगा आलतो.. तर बघितल तर तुम्ही नव्हतावं.. म्हणले बदली होवुन गेले.. काय झालं म्हणलं.. असे म्हणुन मग त्यातलं काय कमी करताव का ? का तेवढचं दयायचं व्हयं मॅडम..मॅडम किती दयायचं मग मी असे म्हणालो. तेव्हा खताळ मॅडम यांनी हिशोब करुन आणुन हया ड्राव्हरमध्ये आणुन टाकुन दया असे म्हणाल्या. तेव्हा मी त्यांना टाकतो तिथं पण किती म्हणलं नेमकं असे म्हणालो. तेव्हा खताळ मॅडम यांनी तुम्हाला तर माहिती आहे की मामा.. तुम्हाला तुमच्या गावातल्या माणसाला माहित असेल की.. त्यांच्या समोर तुम्हाला कसं वेगळ सांगु.. असे म्हणाल्या. तेव्हा मी त्यांना नाही .. आठ दयायचं का दहा दयायचं म्हणलं.. तेव्हा खताळ मॅडम यांनी सोमवारी देवुन जावा.. असे म्हणाल्या. तेव्हा मी त्यांना हां.. किती दयायचं म्हणतोय तर.. असे म्हणालो, त्यावर खताळ मॅडम या सांगितलयं की.. तेवढं नाही म्हणल्यावर.. सांगितलय की मी तुम्हाला .. असे म्हणाल्या. तेव्हा मी त्यांना किती आठ का दहाचं ? दहा हजारचं का ? असे म्हणालो. तेव्हा त्यांनी हजार तर नगच मला दोन हजार तर नगच मला.. दोन तर नग का मला तुमचे .. असे म्हणाल्या. तेव्हा मी त्यांना किती दहा हजारचं दयायच का ? असे म्हणालो . तेव्हा खताळ मॅडम यांनी मान हालवुन होकार दिला व हं.. हं.. माहित नाही का असे म्हणाल्या. तेव्हा मी त्यांना म्या टाकलाय आडतीला माल.. एक तासात येतो असे म्हणालो. अशा आशयाचे आमचेत बोलणे झाल्यानंतर मी व पंच क्रमांक 1 असे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलोत.

त्यानंतर पोहेकॉ जाधव यांनी माझ्याजवळील व्हॉईस रेकॉर्डर काढुन राठोड साहेब यांचे ताब्यात दिले. त्यांनी ते घेवुन बंद केले व बाजुला थांबण्यास सांगितले. लगेच थोडया वेळात मला जवळ बोलावुन हकीगत विचारली असता मी वरील प्रमाणे हकीगत पंच क्रमांक 02 यांचे समक्ष सांगितली. श्रीमती खताळ मॅडम यांनी माझे शेत रस्त्याचे प्रकरणाचे अंतिम निकालावर तहसिलदार साहेब यांची सही घेवुन निकाल देण्यसाठी माझेकडे 10,000/- रुपये लाचेची मागणी करुन मला फाईलवर सोमवारी सही घेणार असल्याचे सांगुन लाच रक्कम देखील सोमवारी घेवुन येणे बाबत सांगितले.

त्यावरुन राठोड साहेब यांनी दिनांक 21.06.2023 रोजीची लाचमागणी पडताळणी कारवाई सर्वानुमते स्थगित करुन दिनांक 26.06.2023 रोजी लाचेच्या सापळ्याचे आयोजन करण्यात येणार असल्याचे सांगितले होते.

त्यावरुन दिनांक 26.06.2023 रोजी सापळा कारवाईकामी मी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, उस्मानाबाद येथे हजर येऊन पंचासमक्ष पोनि राठोड साहेब यंाना सदर दिवशी लोकसेवक या त्यांचे कार्यालयात हजर नसुन, लोकसेवक यांची दुसरीकडे बदली झालेबाबत सांगीतले. त्यावरुन राठोड साहेब यांनी सदर दिवशीची सापळा कारवाई सर्वानुमते स्थगित करण्यात आली होती.

त्यानंतर दिनांक 17.07.2023 रोजी मी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, उस्मानाबाद येथे हजर आल्यानंतर मी पोनि राठोड साहेब यांना सांगितले की, लोकसेवक खताळ मॅडम यांची जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद येथे बदली झालेली असुन, त्यांची जिल्हाधिकारी कार्यालय येथे जाऊन माझे कामानिमीत्त त्यांची भेट घेणार आहे. त्यावरुन पोनि राठोड साहेब यांनी सांगीतले की, दिनांक 17.07.2023 रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद येथे खताळ मॅडम यांचेवर सापळा कारवाई करण्यात येणार आहे असे सांगितले.

त्याअनुषंगाने सापळापुर्व कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगुन, त्यांचे सुचनेवरुन मी माझ्याजवळील सर्व रोख रक्कम, चिजवस्तु ऑफीसमधील टेबलवर काढुन ठेवल्या. त्यानंतर मी काढुन ठेवलेल्या चिजवस्तु व्यतिरिक्त इतर काही माझेकडे नसल्याची खात्री करुन मी हजर केलेले 10000/- रुपये ज्यामध्ये 500/- रुपये दराच्या 20 चलनी नोटांना अँन्थ्रासीन पावडर लावणे, अँन्थ्रासीन पावडरचे उपयोग, अँल्ट्राव्हायलेट दिव्याचा उपयोग व गुणधर्म, त्याचे प्रात्यक्षिक दाखवुन तसेच लाचेच्या नोटांची अंधारात अँल्ट्राव्हायोलेटच्या दिव्याखाली तपासणी वगैरे कार्यवाही केल्यानंतर पोशि/डोके यांनी लाचेच्या नोटा माझे पॅन्टचे समोरील उजवे बाजुच्या खिशामध्ये ठेवुन दिल्या व उर्वरीत वस्तु परत केल्या असता त्या मी माझे पॅन्टचे समोरील डावे बाजुचे खिशामध्ये, मोबाईल शर्टचे छातीवरील डावे बाजुचे खिशामध्ये ठेवुन दिला. त्यानंतर लाच स्विकृतीनंतर डावा हात डोक्यावरुन फिरविणे बाबत ईशारा मला नेमुण दिला.

त्यानंतर पोलीस निरीक्षक राठोड यांनी मला, दोन्ही पंचाना व सापळा पथकातील सदस्यांना सविस्तर सुचना दिल्या.



Scanned with CamScanner

त्यानंतर पोनि राठोड साहेब यांच्या सं◌ागण्यावरुन पोहेकॉ/जाधव यांनी व्हाईस रेकॉर्डरमध्ये नवीन 32 GB चे नवीन S◌anDisk कंपनीचे Micro SDHC I असे वर्णनाचे ज्याचा सिरीयल क्रमांक 2457XV7725LF असलेले मेमरीकार्ड टाकले. सदर व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन पिनने माझे शर्टचे आत बनियनला पिनने लावुन पंच क्रमांक 1 यांचेसह मला माझेकडील मोटार सायकलने रवाना केले. त्यानंतर मी व पंच क्रमांक 1 असे माझेकडील मोटार सायकलने जिल्हाधिकारी कार्यालय येथे जावुन खरात मॅडम यांची भेट घेतली. तेव्हा खताळ मॅडम यांनी तुम्ही लय भारी गाठ घेतली की माझी म्हणुन पडली नसल.. आम्ही बी नोकरी करताव मामा.. तुम्हाला काय वाटतयं आम्हाला काय कळत नाही का.. तुम्ही एवढे शेतकरी असुन .. तुम्ही एवढ हुशार हाय म्हणल्यावर.. आम्ही थोड तर होणारचं का नाही.. बर मी हितली प्रॉपरची हाय.. लांबचीपण नाही की.. गल्ली बोळान माणसं हायती माझी.. असे म्हणाल्या. तेव्हा मी त्यांना सहीला ठेवलं होत म्हणलाव.. त्या दिवशी मला थांबा म्हणलाव.. पुना मी तिथंच थांबलो.. पुना दोन दिवस हेलपाटा माराला घेऊन आलतो मी ..असे म्हणाल्यावर खताळ मॅडम यांनी मला म्हणाल्या की मला माहित हाय की तुम्ही कस घेवुन आलाव.. तिकड जावुन बोलायच.. साहेबाला भेटा .. तिकड भेटा..असे खताळ मॅडम बोलुन तेथुन पैसे न घेताच उठुन निघुन गेल्या. त्यामुळे मी व पंच क्रमांक 1 असे परत लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, उस्मानाबाद येथे परत आलो. त्यावरुन सदर दिवशीची कारवाई स्थगित करण्यात आली होती.
आज दिनांक 18.07.2023 रोजी मी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, उस्मानाबाद येथे हजर येवुन राठोड साहेब यांना सांगितले की, काल दिनांक 17.07.2023 रोजी खताळ मॅडम यांना सापळा कारवाई दरम्यान माझा कसलातरी संशय आल्याने तसेच त्यांची तहसिल कार्यालय, उस्मानबाद येथुन जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद येथे बदली झाल्याने त्यांनी पैशे स्विकारण्यास नकार दिला. तसेच त्यांनी माझे कामासाठी तहसिल कार्यालयातील साहेबांनाच भेटा असे सांगितले आहे. त्यामुळे खताळ मॅडम या यापुढे माझ्याकडुन पैशे स्विकारणार नाही याची मला खात्री झाली आहे. खताळ मॅडम यांचे संपुर्ण नाव गाव बाबत माहिती घेतली असता, त्यांचे नाव स्वाती ज्योतीबा खताळ, लिपिक, जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद असे असल्याचे समजले.

एकंदरीत मी दिनांक 21.06.2023 रोजी दिलेल्या तक्रारीवरुन खताळ मॅडम यांनी दिनांक 21.06.2023 रोजी माझे मौजे उपळा (मा) हद्दीत माझे शेत गट नंबर 292 मधील एकुण क्षेत्रापैकी 1 हेक्टर 24 आर क्षेत्रासाठी शेतरस्ता मिळणेकामी तहसिल कार्यालय, उस्मानाबाद यांचेकडे दाखल केलेल्या अर्जाचे अंतीम निकालावर तहसिलदार यांची स्वाक्षरी घेवुन निकाल देणेकामी माझेकडे श्रीमती खताळ मॅडम यांनी 10000/- रुपये लाचेची मागणी करुन स्विकारण्याचे मान्य केले आहे.

तरी श्रीमती स्वाती ज्योतीबा खताळ, लिपिक, जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद यांचेविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यासाठी मी आज दिनांक 18.07.2023 रोजी माझी फिर्याद देत आहे. हिच माझी फिर्याद असुन सदरची फिर्याद मी वाचुन पाहिली, ती बरोबर व खरी आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

**or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
Gorshnath Rohidas Kharad
**Rank (पद):** SI (Sub-Inspector) **No.(क्र.):** API
**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**



Scanned with CamScanner

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (**प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली**,** बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली**.)**

**R.O.A.C.(**आर**.** ओ **.**ए **.**सी**.)**

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(**तक्रारदाराची/खबर देणा**-**याची सही/अंगठा**):**

**15.Date and time of dispatch to the court**
**(**न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ**):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(**ठाणे प्रभारी अधिका**-**याची स्वाक्षरी**)**

**Name (नाव):** DILIP BABURAO PAR
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):**

पोलीस ठाणे अंमलदार
पोलीस ठाणे
आनंद नगर.उस्मानाबाद



Scanned with CamScanner